"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

कोल्हापूर

NAAC Reaccredited 'A' with CGPA-3.24 ( in 3rd cycle)

ISSN : 2249 - 295X

# VIVEK RESEARCH JOURNAL

A Biannual Peer reviewed National Journal of Multi Disciplinary Research Articles

VOL-VIII, NO.2 | JANUARY, 2019 | Rs. 125/-

VOL VIII NO 2 JANUARY 2019 ISSN 2249 – 2069

# VIVEK RESEARCH JOURNAL

A Biannual Peer reviewed National Journal of Multi Disciplinary Research Articles

**Editor in chief & publiched**

**Dr. S. Y. Hongekar**
Principal, Vivekanand College (Autonomous), Kolhapur
E-mail : editorvivekresearchjournal@gmail.com

**Executive Editor**

**Dr. P. A. Patil**
Vivekanand College (Autonomous), Kolhapur
Email : prabhapatil021@gmail.com

## Editorial Board

**Dr. D. A. Desai**
Associate Prof & Head
Dept of Marathi
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. D. B. Patil**
Associate Prof & Head
Dept of Chemistry
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. K. P. Shinde**
Associate Prof & Head
Dept of Zology
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. S. M. Joshi**
Associate Prof
Dept of English
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. S. R. Kattimani**
Associate Prof
Dept of History
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. A. S. Mahat**
Associate Prof & Head
Dept of Hindi
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. R. Y. Patil**
Associate Prof
Dept of Computer Science
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. Pradip Patil**
Asst. Prof
Dept of Marathi
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. Neeta Patil**
Librarian
Vivekanand College (Autonomous), Kolhapur

**Dr. M.S. Jadhav ( Invitee)**
Associate Prof
Kolhapur

**Dr. Namita Khot ( Invitee)**
Associate Prof
Murgud, Kolhapur

## Advisory Board

**Prin. Abhaykumar Salunkhe**
Executive Chairman,
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur

**Prin. Mrs. Shubhangi Gavade**
Secretary,
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur

**Prin. Dr. Ashok Karande**
Jt. Secretary (Administration),
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur

**Dr. Rajan Gavas**
Head, Dept. of Marathi,
Shivaji University, Kolhapur

**Dr. M. B. Deshmukh**
Prof., Dept. of Chemistry,
Shivaji University, Kolhapur

**Prin. Dr. B. H. Choudhari**
Law College, Osmanabad

# CONTENT

1. **Distribution, Growth And Density of Mitch Animals In Maharashtra: A Geographical Analysis** 3-10
Mr. R. S. Kadam
Mr. P. S. Shende
Dr. A. S. Jadhav

2. **Collection and development of library resources, with reference to Ayurveda** 11-20
Swati Jagtap

3. **Swarajya And Ayurved** 21-30
Dr. Santosh Ganesh Mardhekar

4. **ग्रामीण कवितेतील स्त्री प्रतिमा** 31-35
डॉ. प्रदीप यशवंत पाटील

5. **अभंग स्वरुप व परंपरा** 36-40
सविता दिलीप चौगुले

6. **ग्रामीण महाराष्ट्रातील पाणी पुरवठा आणि स्वच्छता कार्यक्रम संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या विशेष संदर्भात जैन्याळ गावाचे व्यष्टी अध्ययन** 41-48
प्रा. शोभाताई एस. पाटील

# ग्रामीण कवितेतील स्त्री प्रतिमा

डॉ. प्रदीप यशवंत पाटील *

सारांश :

**'शेती' ही अर्थव्यवस्था आणि 'गाव' ही संस्कृतीव्यवस्था असलेल्या भारतीय पर्यावरणामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. आधुनिकतेच्या रेट्यामुळे व काही अंशी वैचारीक परिवर्तनामुळे शहरीकरणाने वेग घेतला. गावे ओस पडू लागली. 'गावव्यवस्था' उध्वस्त होत गेली. प्रश्नांचे प्राधान्यक्रम बदलले. सर्व सुविधा शहरकेंद्रित झाल्या. साहजिकच शहरे फुगत गेली. तरीही बहुतांश लोकांची अर्थव्यवस्था 'गाव–भूमि'शी संबंधित राहिली आहे. अलिकडे गावोगाव भौतिक समृध्दीचे व त्यातून अपरिहार्यपणे येणाऱ्या नागरीकरणाचे वारे झपाट्याने वाहू लागले. यातूनच मिश्र संस्कृती उदयास आली. या परिवर्तनाच्या रेट्याला मुळची गावव्यवस्था कमी पडु लागली. यातच भर म्हणून दूष्काळ, शासकीय दूजाभाव, अनास्था यांमूळे इथला शेतकरी वर्ग सातत्याने भरडला गेला. त्याचे सर्वच पातळ्यांवर शोषण होत राहिले. याचा परिणाम म्हणून संपूर्ण देशभर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु झाले.**

**पारिभाषिक शब्द :** नागरीकरण, सर्जनत्व, कृषीनिष्ठ, पापाचरण, भोगवाद, कोतेपण, स्थायी भाव, दुभंगलेपण, पौरुषी, धर्मकारण, पारमार्थिक आणि अध्यात्मिक.

**प्रस्तावना:**

या सगळयांच्या परिणाम अपरिहार्यपणे कृषीनिष्ठ परंपरेवर झाला आहे. इथली कुंटुबव्यवस्था उद्ध्वस्त होत गेली. या कुंटुबाचे भरणपोषण करणारी स्त्री ही खरेतर भूमाता. परंतू सगळ्यात जास्त शोषण मात्र स्त्रीचे झाले. खरे तर, स्त्री हा इथल्या संस्कृतीचा मूळचा केंद्रबिंदू. मातृसत्ताक परंपरेमध्ये तिच्या अधिकारांना, हक्कांना स्वतंत्र स्थान होते. तिच्यातील नवनिर्माणाचे सर्जनत्व पुरुषांच्या कोरडेपणापूढे प्रभावी ठरत गेले. यातूनच वंशसातत्याला महत्त्व येत गेले. याच गोष्टींचा फायदा घेऊन जिने शेतीचा शोध लावला, त्या स्त्रीला घरातच बांधून टाकले. हळूहळू बंधनाच्या माध्यमातून मातृसत्ताकता संपुष्टात आली व पुरुषसत्ताकता आली. एकूणाच अर्थव्यवस्थेबरोबर या पुरुष सत्ताकतेची बळी इथली 'कृषीनिष्ठ स्त्री' ठरली आहे. कारण नागर स्तरावरील शोषणापेक्षा कितीतरी पटीने अधिक शोषण या स्त्रीचे होत आहे. अशा या भूमिनिष्ठ स्त्रीचे चित्रण बहिणाबाई चौधरींपासून इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख यांच्यापर्यंत अनेक कवींनी केले

* सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, विवेकानंद कॉलेज, (स्वायत्त) कोल्हापूर

आहे. तिच्या जन्मापासून ते आजी आणि मृत्यूपर्यंतच्या विविध अवस्थांचे प्रभावी प्रकटन कृषीनिष्ठ कवितेमध्ये झालेले दिसते.

लेकीचा जन्म ही घटना जिच्यात स्त्रीत्व आहे, अशा मातेलाच दु:खी करते. कारण या पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची कुणीही दखल घेत नाही. उलट तिचे शोषणच केले जाते. पुन्हा एक नवा जीव आपण शोषणासाठी जन्माला घातला, याचे तिला दु:ख आहे. कारण इंद्रजीत भालेराव आपल्या कवितेत म्हणतात,

**'लेकीचा जलम।**
**जणू फुटणारी लाही।**
**खाणारा म्हणतो कशी।**
**भाजलीच नाही।'**

अशी तिची अवस्था असते. पापाचरण, नैतिक बंधने, योनिसूचत्व अशी कितीतरी अवास्तव बंधने स्त्रीवर लादलेली असतात. ती तारूण्यात येते, तेव्हा साहजिकच तिच्याबद्दलचे आकर्षण वाढत जाते. तिच्या आकर्षणाचे सर्व संदर्भ या कवितेने रेखाटले आहेत. स्त्रीबद्दलचा तरुणाईतील प्रेमभाव व्यक्त करणारे हे कवी काहीसे एकांगी पध्दतीने व्यक्त होतात. या अभिव्यक्तिमध्ये तिच्या भावनेला फारशी किंमत असतच नाही.

प्रेमभाव ही जीवनातील अत्यंत सुंदर घटना. सुंदर स्वप्न. खरंतर प्रेमभावाला जात, धर्म, पंथ, वय असल्या कशाचेही बंधन नसते. परंतु प्रेमभावाच्या अवतीभोवती या सगळ्या तटबंदी असतात. विशेषत: कृषीनिष्ठ परंपरेतील प्रेमभावाच्या अभिव्यक्तीला 'गावपणा' ची जबरदस्त तटबंदी आहे. ही तटबंदी अनेक कवितां मधून वेस, उंबरा, सीमारेषा आणि घरंदाजपणा या रुपांमधून व्यक्त होते. या तटबंदीवर 'गावपणा' चे म्हणजे पारंपरिक पुरुषसत्तेचे, सरंजामीचे आणि भोगवादाचे जबरदस्त दडपण आहे. या तटबंदीमुळे अनेकदा दोघांच्याही वाट्याला अपयशच येते. मनातल्या मनात त्या प्रतिमा उराशी बाळगत व्यक्त करणे, एवढेच त्यांना शिल्लक राहते. ऐन उभारणीच्या काळातच त्यांच्या भावनांना सुरुंग लागत जातात व कळत नकळत एक 'समंजस शहाणपण' यायला लागते. हे समंजस शहाणपण ना. धों. महानोर आणि जयराम खेडेकर यांच्या कवितेतून व्यक्त होते.

ना. धों. महानोर यांच्या कवितेतून,

**'डहूळते उरी सांगा !**
**ओल्या आठवांचे धूके!**
**माझ्या उदास पाणेठी !**
**रान पाखरांचे मुके!'**

आणि जयराम खेडेकर यांच्या कवितेतून,

**'भरलेले डोळे। सासरची वाट।**
**उतरली घाट। वेदनेचा। अचानक**
**गेलीस। पसरलं धुकं।**
**रान पडलं मुकं। पाखरांचं।'**

अशा प्रमाणे व्यक्त होते.

अदृश्य तटबंदीने झाकोळणारे हे जगणे कोतेपणाच्या जाणिवेणे भरुन जाते. मनात असूनही आयूष्यभर प्रेमभाव व्यक्त न करणाऱ्या सख्याबद्दल इंद्रजित भालेरावांची कुळंबिणी म्हणते,

**'मण्हा संसार चालावा।**
**नीटनेटका म्हणून।**
**मुकामूकाच राहिला।**
**सारं मनात आणून।'**

कुणाचा तरी संसार फुलावा म्हणून मनातील तटबंदी अधिकच घट्ट करणारा ना. धो. महानोरांच्या कवितेतील नायक म्हणतो,

**'तुझी साद। तुझे आशिर्वाद।**
**प्राणांचे दुवे मळवीत गेले।**
**तुझी साद। तुझे आशिर्वाद।**
**घरभर दिवे लावून गेले।'**

अशा रीतीने प्रकाशाची पुजा करणारे हे अव्यक्त प्रेम तुळशीला मंजूळा आणून देणारे ठरते. ही एकूणच प्रेमभावाबद्दलची प्रगल्भ जाणीव अनेक अर्थानी महत्त्वाची आहे. कारण त्याच जाणिवेतून झाडांसारखे एक स्वच्छ, शांत, त्यागी असे निस्सिम प्रेम उभे राहते.

संयम् व सहनशीलता हे स्त्रीचे आत्यंतिक स्थायी भाव आहेत. हुंड्यासाठी लग्न मोडल्यामूळे आत्महत्या करणारी तरुणी जयराम खेडेकरांच्या कवितेत भेटते. तिने स्वत:चे आयुष्य संपवण्यामागे एका छुपा शोषणाचा संदर्भ आहे. अनेक स्त्रीया मुकाटपणे हे सगळे दु:ख सहन करीत राहतात. आयूष्यभर तिच्या वाट्याला रितेपण आणि कोरडेपण येते. माहेर हे तिच्यासाठी पुन्हा दिवास्वप्नच ठरते. या दृष्टीने खेडेकरांची कविता महत्त्वाची आहे. ते म्हणतात,

**'लेक आल्याची पाहून**
**शेणामातीची माय खिनभर**
**हरखली,**
**अगस्ताकीसुन दोन भाकरी**
**जास्त टाकताना चुलीवरच**
**करपली,**
**ताडकन इचारले वन्सं,**
**आता कसं घ्यान झालं?।**
**ज्याचे त्याला जड, तूमचे**
**मधीच उधळत आलं।'**

अशा तऱ्हेने स्वत:च्याच माहेरी आधारहीन होणारी स्त्री भेटते. तर स्वत:च्याच घरात लेकीसाठी पोरकेपण घ्यावे लागणारी माय तिच्या पदरात आंब्याची कोय बांधून देते. अशा स्त्रीचे रितेपण आणि सातत्यपूर्ण उपेक्षित जीवन चित्रित करताना भालचंद्र नेमाडे लिहितात,

**'हलका आहे खांदा तोवर**
**घे भिंतीला पातेरे,**
**डोळे रिते पुन्हा नको,**
**पून्हा नको आसू'**

आयुष्यभर वाट्याला आलेले रितेपणसूध्दा गर्द करु नको. या रितेपणाचे आसूही डोळ्यात आणू नको, इतके कोरडेपण तूझ्या आयुष्याला येवो, असे नोंदविणाऱ्या

नेमाडेच्या या विधानात प्रचंड मोठा विद्रोह दडला आहे. हा कौटूंबिक व सांस्कृतिक संघर्ष येथेच थांबत नाही. कापसाच्या फवारणीसाठी पाचशे रूपये खर्च करणारा नायक आपल्या म्हाताऱ्या आईसाठी शंभर रूपयांची औषधे आणीत नाही, या घटनेमागे शेतीचे अर्थकारण महत्त्वाचे आहे. हातचे पीक गेल्यानंतर होणारी उपासमार टाळण्यासाठी तो आईला दुयमत्त्व देतो, हे त्याचे दुहेरी दुभंगलेपण महत्त्वपूर्ण आहे.

मातृत्त्व ही स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत आंनददायी घटना. खऱ्या अर्थाने तिच्या नवनिर्माणाचे, सर्जनाचे गावभूमीशी असलेले नाते अधोरेखित करणारी आणि तिला प्रतिष्ठा देणारी ही घटना. या घटनेतून व्यक्त होणारी तिचे आदिम मातृत्त्व कृषीनिष्ठ कवितेने गौरवाने नोंदविले आहे. गावस्तरावरील आजी आणि आई या प्रतिमा खूप समर्थपणे आणि समंजसपणे चित्रित झाल्या आहेत.

इंद्रजित भालेरावांच्या कवितेतील आजी नवऱ्याच्या मागे समर्थपणे आपला संसार पेलते. पौरुषी आव्हानांपासून सर्व संकटांचा ती धीराने मूकाबला करते. संसार नेटाने नेटका उभा करते. हीच आजी खेडेकरांच्या कवितेत संपूर्ण गावाची अदिमाता बनून येते. इतकेच नव्हे तर ती कवीच्या कवितेचा पाऊस होउन जाते. तिचे हे पुरुषार्थपण व्यक्त करताना खेडेकर लिहितात,

**'आल्या गेल्याच्या घरात ती**
**पूरणपोळी रांधायची,**
**उन्हातल्या गायवासरांना सावलीत**
**बांधायची।'**

खऱ्या अर्थाने आजीचे हे 'धर्मकारण' आहे. मानवता आणि मदत हाच तिचा खरा धर्म आहे. जो भूमीशी संबंधित आहे. साहजिकच तिच्या अर्थकारणाला मानवी चेहरा असलेला दिसतो.

सर्वस्व पणाला लावणारी, आयूष्याची राखरांगोळी करुन घर—कुंटुब उभे करणारी स्त्री खऱ्या अर्थाने सक्षम आहे. तिच्यातले अदिमत्व आणि सर्जनत्त्व बहुआयामी आहे. कृषीनिष्ठ पंरपरेतील आई—आजीचीं प्रतिमा एकूणच मराठी साहित्यात वेगळा ठसा उमटवणारी, उठावदार अशी आहे. स्त्रीतले पौरुषत्व हा ह्यातला महत्त्वाचा भाग. कारण गावभूमीतील या स्त्रीचे दुयमत्त्व येथे व्यक्त होत असेल तरी ती निव्वळ दुयम आणि भोगवस्तू म्हणून येत नाही. कुनबी की मध्ये आणि विकृत प्रतिष्ठेच्या धरंदाजपणा मध्ये तिच्यावर अत्याचार, अन्याय होत असेल, तरी या सर्व अन्यायाला ती नीटपणे व धीटपणे प्रतिक्रिया देते. त्याच्या विरोधात उभी राहते. तिची ही भूमिका तिचे 'वस्तुत्वपण' नाकारणारी आहे. तिच्यातली अदित मातृसत्ताकत्व अनेकदा उफाळून येते. अर्थात हेच इथले वास्तवही आहे आणि ही सगळी कविता वास्तवाशी समांतर जाणारी आहे.

जयराम खेडेकरांच्या कवितेतील स्त्री, तिच्यावर जेव्हा सासरा अत्याचार करायचा प्रयत्न करतो, तेव्हा ती स्वाभिमानाने माहेरी निघून जाते. आयुष्यभर भळभळीत जखम घेऊन जगत राहते. एकाकी पडलेला नवरा तिला न्यायला येतो, तेव्हा ती म्हणते,

**'संसार नुसता सड्या सारवणाचा नसतो,**
**ह्या करपल्या जीवाने**
**चुलीवर भाकरी तरी कशा भाजाव्यात?'**

असा विद्रोह करणारी ही स्त्री समाधानासाठी पारमार्थिक आणि अध्यात्मिक गोष्टीत बुडून जाते. तिच्या या भूमिकेमागे चिरतरूण वेदना असली तरी जीवनाचे उच्च कोटींचे तत्वज्ञान यातून व्यक्त होताना दिसते. हा विद्रोह कुटुंबापुरता मर्यादित असला तरी ना. धो. महानोरांची नायिका संपूर्ण व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करते. तिचा नवरा जेव्हा आत्महत्या करतो व नंतर शासन मदतीची पाने तोंडाला पुसायला येतो, तेव्हा त्या घटनेबद्‌दलची प्रतिक्रिया महत्त्वाची आहे,

**'धाबडाचात जाऊन फाडलेल्या पदरात दहा हजार गुंडाळले साहेबांनी दिलेले,**
**साहेबा समोरच आक्काडी लावली**
**आणि ती पुन्हा दु:खाच्या ओझ्यांत**
**गर्भाचा ओझ्यात कोसाळून पडली'**

दु:खाच्या ओझ्याने ती कोलमडून पडत असली तरी एकूण व्यवस्थेच्या विरोधात तिने केलेला विद्रोह महत्त्वाचा आहे. कुठेतरी स्त्री नव्याने या व्यवस्थेच्या विरोधात बोलू लागली आहे. याचे चित्रण करताना प्रतिमा इंगोले लिहितात,

**'जावईबूवा।**
**जास्त बोलाचं काम नायी।**
**पोसीन लेक मायी,**
**धाळत तिले नायी।**

स्वत: अत्याचार सहन करणारी स्त्री जेव्हा आपल्या लेकीवर अनन्वित अत्याचार होतात, तेव्हा मात्र ती बंड करुन उठते. आयूष्यभर लेकीला सांभळायला तयार होते.

## समारोप:

जन्माआधीपासूनचे भूमीशी असलेले नाते टिकवण्यासाठी व त्या भूमीवर उभा असलेला गाव आणि त्याचे गावपण आकारित, संस्कारीत करण्यासाठी स्त्री आयुष्यभर कष्ट करीत राहते. घराला 'गावपण' आणि गावाला 'घरपण' देते. माणसांना माणूसपण देते. गावाला भूमीपण देते. अशी ही सर्व आघाडयांवर लढणारी, मोडून पडली तरी पून्हा उभी राहणारी सक्षम स्त्री विकासाच्या नव्या दिशा सूचित करताना आपले चिरंतनत्व सिध्द करते. 'टिकून राहणे व सर्जनशील असणे' हे शेतीचे सर्व संदर्भ स्वत:मध्ये अनुस्यूत असलेली ही भूमीनिष्ठ भूमिकन्या आपले कूणबीपण समर्थपणे पेलताना दिसते. तिची ही भूमीला सर्जनशील, वंशसातत्य आणि भूमीतत्त्वाशी नाते सांगणारी आहे.

## संदर्भ ग्रंथ

कदम, महेंद्र – 'कवितेचे वर्तमान', दर्या प्रकाशन पुणे, प्र. आ. २०१५.